| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 10 Jun 2024 | Important role of Indian companies in providing health insurance to senior citizens | Kesari |

# ज्येष्ठांना आरोग्य विम्याचे बळ देण्यात भारतीय कंपन्यांची महत्त्वाची भूमिका

भारतासारख्या वैविध्यपूर्ण आणि गतिमान देशात ज्येष्ठ नागरिकांचा आदर आणि काळजी घेण्याची परंपरा आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विम्याची भूमिका खूप महत्त्वाची ठरते. लोकसंख्येचा विचार करता २०५० पर्यंत १४.४ कोटी ज्येष्ठ नागरिक असतील, असा अंदाज आहे. पॉप्युलेशन रेफरन्स ब्यूरोने या संदर्भातील आकडेवारी नुकतीच जाहीर केली आहे. त्यामुळे ज्येष्ठांच्या आरोग्याचे रक्षण करणे आता काळाची गरज बनली आहे.

ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य विम्याचे कवच प्रदान करून त्यांच्या पालकत्वासाठी एक प्रकारे उचललेले हे पाऊल ठरते. तसेच विमा कवच प्रदान केल्यास त्यांना किंवा त्यांच्या प्रियजनांवरील आर्थिक भार कमी होण्यास मदत मिळते. तसेच त्यांना दर्जेदार आरोग्यसेवेचा मार्ग प्रशस्त होण्यास मदत मिळणार आहे.

भारतीय नियामक आणि विकास प्राधिकरणाने (आयआरडीए) अलीकडेच ज्येष्ठांसाठी अधिक स्पष्ट आणि अधिक सुलभ आरोग्य विम्याचे पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी पुढकार घेतला आहे. देशात विमा नसलेल्या ज्येष्ठांची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे हे विमा नियम अधिक सोपे बनविण्यावर भर दिला जात आहे.



प्रथमच विमा संरक्षण शोधणाऱ्यांसाठी आणि ज्येष्ठांच्या आरोग्यसेवेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नियम तयार केले आहेत. ते नियम नावीन्यपूर्ण विमा उत्पादनांच्या विकासाचा मार्गदेखील सोपा करतात. वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत ज्येष्ठांना आर्थिक संरक्षण प्रदान करतात. विशेष म्हणजे हे नियम ज्येष्ठांसह सर्व नागरिकांसाठी फायदेशीर आहेत. कारण त्या माध्यमातून अनेक समस्यांचे निराकरण होण्यास मदत मिळते. त्यात विशिष्ट रोगांसाठी प्रतीक्षा कालावधी कमी करणे आणि आधीच अस्तित्वात असलेली वैद्यकीय परिस्थिती, आजीवन पॉलिसीचे नूतनीकरण, आयुष उपचारांचा समावेश करण्यासाठी विस्तारित कव्हरेज, दीर्घ मोफत- लूक पीरियड आणि कमी केलेला अधिस्थगन कालावधी यांचा समावेश आहे.

**मूल्यांकन करा, विमा निवडा**

सुरुवातीला, आरोग्य विमा निवडताना, वय आणि आरोग्याची स्थिती यासारख्या घटकांच्या आधारे तुमच्या गरजांचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. प्रतीक्षा कालावधी आणि अपवर्जनांसह, विविध योजना पर्याय आणि ते काय कव्हर करतात याबद्दल माहिती घेण्याचा सल्ला दिला जातो. नियमांमुळे ही प्रक्रिया पूर्वीपेक्षा अधिक ग्राहक-अनुकूल आणि सुलभ झाली आहे. जर कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांनी विमा काढला नसेल, तर त्यांच्यासाठी कव्हरेज सुनिश्चित करण्यासाठी ही चांगली वेळ आहे.

**प्रतीक्षा कालावधीला सामोरे कसे जावे**

ज्येष्ठ नागरिकांसाठी पूर्व-अस्तित्वात असलेल्या परिस्थितीसाठी प्रतीक्षा कालावधी ही चिंतेची बाब आहे. तथापि, आयआरडीएच्या निर्णयानंतर, आरोग्य विम्यासाठी प्रतीक्षा कालावधी आता सर्वांसाठी ३६ महिन्यांपर्यंत मर्यादित केला आहे. पूर्व-अस्तित्वात असलेले आणि विशिष्ट रोग, असे दोन प्रतीक्षा कालावधी आहेत. दोघांचाही प्रतीक्षा कालावधी ३६ महिन्यांच्या कमाल आहे.

काही विमा योजना विशिष्ट रोग आणि पूर्व-अस्तित्वात असलेल्या परिस्थितींसाठी ज्येष्ठांना १२ महिन्यांपेक्षा कमी प्रतीक्षा कालावधी देतात. या पॉलिसींचे प्रीमियम थोडे जास्त असले तरी, ते विशिष्ट आजारांसाठी जलद कव्हरेज सुनिश्चित करतात. तसेच तुम्हाला जलद संरक्षण प्रदानही करतात.

विमा पॉलिसी देण्यापूर्वी बहुतेक विमा कंपन्या पूर्व-वैद्यकीय चाचणीचा आग्रह धरतात. तथापि, दुसऱ्या पद्धतीमध्ये तुमची पूर्व-विद्यमान स्थिती असल्यास वैद्यकीय रेकॉर्ड कंपनीला द्यावे लागेल. ही सर्व माहिती गोळा करून विमाकर्ता तुमच्या वैद्यकीय इतिहासाचे मूल्यांकन करू शकतो. त्यानुसार तुमचा प्रस्ताव स्वीकारू शकतो. ज्यामुळे तुमच्या दाव्याच्या वेळी कोणताही नकार मिळण्याची शक्यता दुरावते.

वैद्यकीय इतिहास आणि आरोग्याची माहिती देण्यास पुढाकार घ्या



यात्यतिरिक्त, मॉड्यूलर आणि लवचिक आरोग्य विमा योजना निवडणे असा पर्याय तुम्ही निवडू शकता. या योजना तुम्हाला १२ ते ३६ महिन्यांपर्यंतचा प्रतीक्षा कालावधी निवडण्याची परवानगी देतात. ज्यामुळे तुम्हाला प्रतीक्षा कालावधीबाबत लवचिकता मिळेल. परिणामी, प्रीमियम, अधिक वैयक्तिक आणि अनुकूल कव्हरेज मिळू शकण्यास हातभार लागेल.

**कमी प्रीमियम खर्चासह अनुरूप कव्हरेज**

अनेक ज्येष्ठांना आरोग्य विमा प्रीमियमच्या प्रचंड खर्चाची चिंता असते. तथापि, तुमच्या वैयक्तिक गरजा पूर्ण करण्यासाठी विविध प्रवेशयोग्य योजना तयार केल्या जाऊ शकतात. एक पथदर्शी योजना तुम्हाला तुम्हाला हवी असलेली वैशिष्ट्ये निवडून देते. त्यामुळे तुम्ही फक्त तुम्हाला आवश्यक असलेल्या गोष्टींसाठी पैसे द्या. हा दृष्टिकोन केवळ प्रीमियम्स अधिक सुटसुटीत करण्यास मदत करू शकतो. त्याचे फायदही सर्वसमावेशक असे आहेत.

**तपन सिंघल**
व्यवस्थापकीय संचालक आणि
मुख्य कार्यकारी अधिकारी,
बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स

या योजनांसह, तुम्ही तुमचे कव्हरेज अनुकूल बनवू शकाल. बाह्यरुग्ण सेवांसाठी प्रीमियम दुप्पट आणि ५ कोटीपर्यंत उच्च कव्हरेजचा पर्याय, तसेच आणीबाणीसाठी आंतरराष्ट्रीय कव्हरेज यासारखे फायदे मिळवू शकता. त्याशिवाय होम नर्सिंग कव्हर, एकत्रित बोनस आणि वैद्यकीय खर्च यांचा समावेश आहे.

**कव्हरेज वाढवणे, प्रीमियमचे व्यवस्थापन करणे**

आरोग्य विमा योजना निवडण्याचा विचार करण्याची शिफारस केली जाते, तेव्हा महागाईच्या बरोबरीने दरवर्षी विम्याची रक्कम वाढवण्याचा लाभ दिला जातो. काही प्लॅन्समध्ये बिल्ट-इन इन्फ्लेशन प्रोटेक्शन वैशिष्ट्य असते, तर काही ते अॅड-ऑन म्हणून देऊ शकतात. जास्त विम्याची रक्कम असल्याने तुम्हाला वाढत्या वैद्यकीय खर्चापासून, विशेषत: कर्करोग आणि इतर गंभीर आजारांपासून संरक्षण मिळू शकते.

**सर्वसमावेशक रायडर्ससह आरोग्य विमा वाढवणे**

बेस हेल्थ इन्शुरन्स प्लॅनमध्ये रायडर्स जोडणे हा एक शहाणपणाचा निर्णय आहे का असा प्रश्न व्यक्तींना पडतो. सर्वसमावेशक समर्थन प्रणालीची ज्येष्ठांकडून मागणी होत आहे. त्यानुसार अनेक विमा कंपन्या आता त्यांच्या मानक बेस प्लॅनसह ज्येष्ठांसाठी सुस्पष्टपणे तयार केलेल्या रायडर्स ऑफर करतात.

या रायडर पर्यायांचा एक उल्लेखनीय पैलू म्हणजे वैयक्तिक प्राधान्ये सामावून घेण्याची लवचिकता असते.